14 APR 2022

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# डी. वाय. पाटील यांनी बहुजन समाजात शिक्षण वाढविले

## शाहू छत्रपती : प्राचार्य रा. कृ. कणबरकर राष्ट्रीय पुरस्काराने सन्मान

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** बहुजन समाजात शिक्षण वाढविण्याचे मोठे कार्य डॉ. डी. वाय. पाटील यांनी केले. लाखो विद्यार्थ्यांचे आयुष्य घडविणाऱ्या उत्तुंग व्यक्तिमत्त्वाला प्राचार्य रा. कृ. कणबरकर यांच्या नावाने पुरस्कार देऊन शिवाजी विद्यापीठाने त्यांच्या कार्याचा यथोचित सन्मान केला आहे, असे प्रतिपादन शाहू छत्रपती यांनी बुधवारी येथे केले.

विद्यापीठातील राजर्षी शाहू सभागृहात शाहू छत्रपती यांच्या हस्ते माजी राज्यपाल डॉ. पाटील यांना प्राचार्य रा. कृ. कणबरकर राष्ट्रीय पुरस्कार प्रदान करण्यात आला. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, तर शांतादेवी डी. पाटील, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, डी. वाय. पाटील विद्यापीठाचे कुलपती डॉ. संजय डी. पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. मानपत्र, शाल-श्रीफळ आणि १ लाख ५१ हजार रुपयांचा धनादेश असे या पुरस्काराचे स्वरूप होते. शाहू छत्रपती म्हणाले, डी. वाय. पाटील यांच्याशी माझा जुना स्नेह आहे.

त्यांनी राजकारणातून अलिप्त होऊन शैक्षणिक क्षेत्रात प्रवेश केला. टप्प्याटप्प्याने महाविद्यालय, शाळांची सुरुवात करत बहुजन समाजात शिक्षण वाढविले. गुणवत्तापूर्ण शिक्षणामुळे त्यांच्या संस्था दिवसेंदिवस अधिक विकसित होत आहेत. शिवाजी विद्यापीठ, डी. वाय. पाटील विद्यापीठाने जागतिक पातळीवर मोठी भरारी घ्यावी. डॉ. डी. वाय. पाटील म्हणाले, माझे गुरू प्राचार्य डॉ. रा. कृ. कणबरकर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ त्यांच्या नावाने शिवाजी विद्यापीठाने मला सन्मानित केले.

हा पुरस्कार माझ्यासाठी मोलाचा आहे. डी. वाय. पाटील विद्यापीठाचा शैक्षणिक वटवृक्ष साकारण्यास आपल्या सर्वांचे मोठे सहकार्य लाभले आहे. कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, पाटील आणि कणबरकर कुटुंबीयांमध्ये त्यागाचा समान धागा आहे. डॉ. पाटील यांनी व्यक्त केलेल्या इच्छेनुसार संत साहित्याचा अभ्यास करणाऱ्यांसाठी पुरस्कार सुरू करण्यात येईल.

या कार्यक्रमास डॉ. जे. एफ. पाटील, बी. पी. साबळे, अरुण कणबरकर, क्रांतीकुमार पाटील, अरुण डोंगळे, नमिता खोत, आनंद पाटील, आदी उपस्थित होते. प्राचार्य बी. ए. खोत यांनी प्रास्ताविक केले. डॉ. रणधीर शिंदे यांनी मानपत्र वाचन केले.

नंदिनी पाटील, धैर्यशील यादव यांनी सूत्रसंचालन केले. प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी आभार मानले.




कोल्हापुरातील शिवाजी विद्यापीठात बुधवारी त्रिपुरा, बिहारचे माजी राज्यपाल डॉ. डी. वाय. पाटील यांना शाहू छत्रपती आणि कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्याहस्ते प्राचार्य रा. कृ. कणबरकर राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यावेळी शेजारी डावीकडून प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, प्र-कुलगुरु डॉ. पी. एस. पाटील, शांतादेवी डी. पाटील, प्राचार्य डॉ. बी. ए. खोत उपस्थित होते. (छाया : आदित्य वेल्हाळ)

### डॉ. पाटील यांनी दिली विद्यापीठाला ११ लाखांची देणगी

पूर्वी शिक्षण संपल्यानंतर गुरुदक्षिणा देण्याची प्रथा होती. आता सर्व बदलले असून गुरु हे शिष्यांचा गौरव करत आहेत. माझी गुरुदक्षिणा म्हणून या पुरस्काराच्या रकमेत दहा लाख रुपये घालून शिवाजी विद्यापीठाला ११ लाख ५१ हजार रुपयांची देणगी प्रदान करतो. त्यातून संत साहित्य क्षेत्रात प्रभावी काम अथवा अभ्यास करणाऱ्यांसाठी विद्यापीठाने पुरस्कार सुरु करावा, अशी अपेक्षा डॉ. डी. वाय. पाटील यांनी व्यक्त केली. त्यांनी व्यासपीठावरच देणगीचा धनादेश कुलगुरु डॉ. शिर्के यांच्याकडे सुपूर्द केला.

लोकमत

# विद्यापीठात शनिवारी 'साहित्य चर्चा'

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील मराठी अधिविभागातर्फे गो. मा. पवार यांच्या स्मृतिदिनानिमित्त शनिवारी (दि. १६) सकाळी साडेअकरा वाजता 'साहित्य चर्चा' कार्यक्रम होणार आहे. 'गो. मा. पवार : व्यक्ती आणि विचार' या विषयावरील चर्चेत प्राचार्य डॉ. संतोष कोटी (सोलापूर), डॉ. अशोक बाबर, प्रा. अविनाश सप्रे (सांगली) हे सहभागी होणार आहेत. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के असतील.

14 APR 2022

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

लोकमत

# 'हिंदी भूषण'ने अर्जुन चव्हाण सम्मानित

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** हिंदी साहित्यामध्ये गीत, गजल आणि समीक्षा क्षेत्रात दिलेल्या योगदानाबद्दल शिवाजी विद्यापीठातील हिंदी विभागाचे माजी प्रमुख डॉ. अर्जुन चव्हाण यांना विश्व हिंदी शोध संवर्धन अकादमीच्यावतीने 'हिंदी भूषण' पुरस्काराने गौरविण्यात आले.

वाराणसी येथील काशी विद्यापीठात पुरस्कार सोहळा पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संपूर्णानंद संस्कृत विद्यापीठाचे कुलगुरू राजाराम शुक्ल, साहित्यकार वशिष्ठ अनूप, हिंदी साहित्य अकादमीचे कार्याध्यक्ष डॉ. शीतलाप्रसाद दुबे, उत्तर प्रदेश हिंदी संस्थानच्या डॉ. अमिता दुबे उपस्थित होते. यापूर्वी त्यांना साहित्य शिरोमणि मॉरिशस सन्मान, मॉरिशस हिंदी अकादमी सन्मान, हिंदी साहित्य अकादमी, तत्कालीन पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्या हस्ते अहिंदी भाषी हिंदी लेखक आदी राष्ट्रीय पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे.



वाराणसी येथे कोल्हापूरचे डॉ. अर्जुन चव्हाण यांना सुप्रसिद्ध कवी केशव जालाना यांच्या हस्ते 'हिंदी भूषण' पुरस्काराने गौरविण्यात आले.

## ५० पुस्तकांचे लेखक

डॉ. अर्जुन चव्हाण यांनी ५०हून अधिक मौलिक, समीक्षात्मक, अनूदित, संपादित ग्रंथाचे लेखन केले आहे. ते मॉरिशस, रशिया, उज्बेकिस्तानसह 350 हून अधिक चर्चासत्रांत, सम्मेलनांत, कार्यशाळांमध्ये प्रमुख पाहुणे, विषय तज्ज्ञ म्हणूनही सहभागी झालेले आहेत.

लोकमत

# प्री-पीएचडीचे परीक्षा अर्ज भरण्यास मुदतवाढ

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : सर्व शाखांच्या एम. फिल., प्री-पीएचडी कोर्सवर्क थेअरी परीक्षा शिवाजी विद्यापीठाकडून घेण्यात येणार आहेत. त्यासाठी अर्ज करण्यास दि. १८ एप्रिलपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. महाविद्यालय अथवा पदव्युत्तर अधिविभागाने परीक्षा अर्ज ऑनलाईन मंजूर करण्याची मुदत दि. १९ एप्रिलपर्यंत आहे. विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाने आतापर्यंत एकूण ४४२ परीक्षांचे निकाल जाहीर केले आहेत. बी. एस्सी., एम. एस्सी. (नॅनो सायन्स ॲण्ड टेक्नालॉजी सत्र एक, तीन आणि सात), बी. एड्. (सत्र तीन आणि चार) या परीक्षांचे निकाल बुधवारी जाहीर केले, अशी माहिती परीक्षा मंडळाचे प्रभारी संचालक गजानन पळसे यांनी दिली.

14 APR 2022

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर




कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचा 'प्राचार्य रा. कृ. कणबरकर पुरस्कार' डॉ. डी. वाय. पाटील यांना प्रदान करताना शाहू महाराज. शेजारी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. डावीकडून प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, सौ. शांतादेवी डी. पाटील आणि प्राचार्य बी. ए. खोत. (छाया : पप्पू अत्तार)

# आधुनिक शिक्षण बहुजनांपर्यंत नेण्याचे कार्य डॉ. डी. वाय. पाटील यांनी केले

## शिवाजी विद्यापीठाचा प्राचार्य कणबरकर पुरस्कार प्रदान

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

बहुजन समाजातील घटकांपर्यंत आधुनिक शिक्षण पोहोचवण्याचे काम डॉ. डी. वाय. पाटील यांनी केले, असे गौरवोद्गार शाहू महाराज यांनी काढले.

शिवाजी विद्यापीठातर्फे देण्यात येणारा 'प्राचार्य रा. कृ. कणबरकर पुरस्कार' शाहू महाराज यांच्या हस्ते डॉ. डी. वाय. पाटील यांना प्रदान करण्यात आला, यावेळी ते बोलत होते. शाल, श्रीफळ, मानपत्र, स्मृतिचिन्ह आणि १ लाख ५१ हजार रुपये असे पुरस्काराचे स्वरूप आहे. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के होते. यावेळी सौ. शांतादेवी डी. पाटील आणि डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठाचे कुलपती डॉ. संजय डी. पाटील प्रमुख उपस्थित होते.

राजकारणापासून अलिप्त होऊन शैक्षणिक कार्य करण्याचा डॉ. डी. वाय. पाटील यांचा निर्णय खूप मोठा होता. केवळ देशातच नव्हे, तर आंतरराष्ट्रीय पातळीवरही त्यांनी आपल्या संस्थांचा विस्तार केला आहे. या संस्थांतून विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण दिले जात आहे. शिवाजी विद्यापीठाने त्यांना डी.लिट.सह कणबरकर पुरस्कार देऊन त्यांच्या कार्याचा यथोचित सन्मान केल्याचे शाहू महाराज म्हणाले.

### गुरूंच्या नावाने पुरस्कार हा सन्मान

आपल्या गुरूंच्या नावाने मिळालेला पुरस्कार हा सर्वात मोठा सन्मान आहे. पुरस्काराच्या १ लाख ५१ हजार रुपयांच्या रकमेत आणखी १० लाख रुपयांची भर घालून त्यांनी ११ लाख ५१ हजार रुपयांचा निधी शिवाजी विद्यापीठाकडे सुपूर्द केला. या निधीचा विनियोग संत साहित्याच्या अभ्यासासाठी करावा, अशी अपेक्षा डॉ. डी. वाय. पाटील यांनी व्यक्त केली.

या पुरस्कारामुळे आपल्या मनात उपकृततेची भावना दाटली आहे. अन्य पुरस्कारांपेक्षा हा पुरस्कार आपल्यासाठी खूप वेगळा आणि जवळचा आहे. पूर्वी गुरुदक्षिणा दिली जायची; पण आज गुरूकडून शिष्याचा सन्मान झाला आहे, हे या पुरस्काराचे वेगळेपण असल्याचे डॉ. डी. वाय. पाटील यांनी आवर्जून सांगितले. कुलगुरू डॉ. शिर्के यांनी विद्यापीठाची मानद डी.लिट. ज्यांना दिली त्या डॉ. डी. वाय. पाटील यांना त्यांच्या गुरूंच्या नावाचा पुरस्कार देण्यात आल्याने हा विद्यापीठाच्या दृष्टीने भाग्याचा क्षण असल्याचे सांगितले.

मराठी अधिविभागाचे प्रमुख डॉ. रणधीर शिंदे यांनी मानपत्राचे वाचन केले. प्राचार्य डॉ. बी. ए. खोत यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी आभार मानले. नंदिनी पाटील व धैर्यशील यादव यांनी सूत्रसंचालन केले. माजी कुलगुरू डॉ. बी. पी. साबळे, डॉ. जे. एफ. पाटील, डॉ. बी. एम. हिर्डेकर, डॉ. डी. आर. मोरे यांच्यासह शिक्षण क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

पुढारी

# 'डॉ. संगवे आंतरराष्ट्रीय कीर्तीचे समाजशास्त्रज्ञ'

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

डॉ. विलास संगवे हे आंतरराष्ट्रीय कीर्तीचे समाजशास्त्रज्ञ होते, असे मत भारतीय समाजशास्त्र संस्थेचे माजी अध्यक्ष प्रा. डॉ. परमजितसिंग जज्ज यांनी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठाच्या समाजशास्त्र विभागात आयोजित प्रा. डॉ. विलास संगवे स्मृती व्याख्यानात 'प्रबोधन, तर्कसंगतता आणि समाजशास्त्राचा उदय : पुराणमतवादी प्रतिक्रिया समजून घेणे' या विषयावर ते बोलत होते.

प्रबोधन व तर्कसंगतता यांच्या संगमातून समाजशास्त्राचा उदय कसा झाला यावर प्रकाश टाकून समाजशास्त्राच्या उदयाची ऐतिहासिक पार्श्वभूमी त्यांनी स्पष्ट केली.

कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के यांनी डॉ. संगवे यांनी शाहू महाराजांच्या विषयी केलेले संशोधन अतिशय मोलाचे आहे, असे सांगितले.

यावेळी प्र. कुलगुरू प्रा. डॉ. पी. एस. पाटील, डॉ. एस. एन. पवार यांनी मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक डॉ. प्रल्हाद माने यांनी केले. स्वागत विभागप्रमुख प्रा. डॉ जगन कराडे यांनी केले. सूत्रसंचालन अभिजित पाटील, आकाश ब्राह्मणे यांनी केले. आभार डॉ. पी. बी. देसाई यांनी मानले. कार्यक्रमास डॉ. आर. बी. पाटील, डॉ. एस. एल. गायकवाड, प्राध्यापक, विद्यार्थी उपस्थित होते.

पुढारी

# एम. फिल., पीएच. डी. कोर्सवर्क परीक्षा अर्ज प्रक्रियेसाठी मुदतवाढ

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या वतीने शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील ऑक्टोबर-नोव्हेंबर हिवाळी सत्रातील एम.फिल., पीएच. डी. कोर्स अभ्यासक्रम परीक्षेसाठी अर्ज प्रक्रियेस १८ एप्रिलपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

विद्यापीठ अधिकार मंडळाच्या निर्णयानुसार परीक्षा पद्धतीत बदल केला आहे. आता वर्षातून दोनवेळा परीक्षा घेतल्या जाणार आहेत. विद्यापीठाने अर्ज व परीक्षा प्रारंभ तारखांमध्ये बदल केला आहे. त्यानुसार विद्यार्थ्यांना १८ एप्रिलपर्यंत विनाविलंब अर्ज करता येणार आहे. महाविद्यालये व पदव्युतर विभागाने दि. १९ पर्यंत परीक्षा अर्ज ऑनलाईन अॅप्रुव्ह करायचे आहेत. २० एप्रिलपर्यंत परीक्षा अर्ज याद्या सादर करण्याची मुदत आहे.

14 APR 2022

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# समाज परिवर्तनाचे महानायक

**सामाजिक समतेसाठी विषमतेविरुद्ध आणि सामाजिक न्यायासाठी अन्यायाविरुद्ध युद्ध लढणारे योद्धा म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना आपण समजून घेतले पाहिजे. आज डॉ. आंबेडकर यांची जयंती, त्यानिमित्त...**

शतकानुशतके वंचित असलेल्या समाजाला अस्मितेची ओळख देण्याचे आणि त्याचबरोबर समतेवर आधारित नवसमाजाचे स्वप्न पाहण्याचे आत्मभान भारतीय समाजाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यामुळेच निर्माण झाले. समाज परिवर्तनासाठी चाललेल्या सामाजिक युद्धाचे ते महानायक होते. भारतातील समाजव्यवस्था सर्वंकष बदलून नवीन व्यवस्था देशाला देण्यासाठी त्यांनी आयुष्यभर कष्ट घेतले. अस्पृश्यता आणि जातीव्यवस्था यांच्यामुळे निर्माण झालेल्या अंधकारात खितपत पडलेल्या लोकांसाठी क्रांतिसूर्याचा उदय म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जीवितकार्य होय. फक्त दलित शोषितच नव्हे, तर अखिल मानवतेच्या कल्याणासाठी त्यांनी कार्य केले. त्यांच्या बहुआयामी व्यक्तिमत्त्वाने आणि बहुक्षेत्रीय कार्याने भारतीय माणसाच्या जीवनातील विविध क्षेत्रांसाठी त्यांनी योगदान दिले. माणसाला माणुसकीने वागविले गेले पाहिजे, यासाठी त्यांनी अनेक लढे दिले. सर्वच माणसांना समतेने वागविले पाहिजे, यासाठी त्यांनी आपला विचार संविधानसभेत प्रभावीपणे मांडला. दलित, शोषित, स्त्रिया, शेतकरी, कामगार, भटके विमुक्त, आलुतेदार, बलुतेदार यांच्या हक्कासाठी त्यांनी वेळोवेळी आपल्या बुद्धी कौशल्याचा वापर करून लढा दिला. सामाजिक समतेसाठी, विषमतेविरुद्ध आणि सामाजिक न्यायासाठी, अन्यायाविरुद्ध युद्ध लढणारे योद्धा म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना आपण समजून घेतले पाहिजे.

अस्पृश्यांना मूलभूत मानवी हक्क नाकारले गेले होते. यासाठी त्यांनी संघर्ष केला. महाडचा सत्याग्रह (२० मार्च १९२७), मनुस्मृती दहन (२५ डिसेंबर १९२७), काळाराम मंदिर सत्याग्रह (२ मार्च १९३०) अशी अनेक लोकचळवळींची आंदोलने बाबासाहेबांनी घडवून आणली. यातून दुहेरी रणनीती राबविली. लोकांना अस्पृश्यतेच्या विरोधात जागे केले आणि इंग्रजी सत्तेला या प्रश्नांची तीव्रता दाखवून देणे हा त्यांचा उद्देश होता. अस्पृश्यांबरोबरच जे जे वंचित आहेत, त्यांनाही त्यांचा हक्क आणि त्यांचे योग्य प्रतिनिधित्व मिळाले पाहिजे अशी व्यापक भूमिका त्यांनी घेतलेली दिसून येते. इतिहासातील सर्वात मोठ्या शेतकऱ्यांच्या आंदोलनाचे नेतृत्व डॉ. आंबेडकरांनी केले होते. भारतीय शेतीच्या प्रश्नांवर त्यांचे मूलभूत चिंतन होते. 'भारतातील लहान धारण क्षेत्रे आणि त्यावरील उपाय' या लेखामध्ये त्यांनी शेती प्रश्नासंदर्भात मूलभूत भाष्य केले आहे. शेती हा शासकीय उद्योग असावा, असे त्यांचे मत होते.



'मूकनायक', 'बहिष्कृत भारत', 'जनता' आणि 'प्रबुद्ध भारत' अशा वृत्तपत्रांमधून शोषितांच्या न्याय्य हक्कासाठी त्यांनी आवाज उठविला. त्यांची पत्रकारिता परखड व मानवी समाजाला दिशा देणारी ठरली. स्वतंत्र मजूर पक्ष, शेड्यूल्ड कास्ट फेडेरेशन या पक्षांच्या माध्यमातून शोषितांच्या राजकीय अस्तित्वाची लढाई लढली गेली. सर्वसमावेशक अशा लोकसत्ताक तत्त्वावर आधारलेल्या भारतीय रिपब्लिकन पक्षाचे स्वप्न त्यांनी पाहिले होते.

नवभारताच्या उभारणीसाठी स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय या तत्त्वांवर आधारित संविधानाचे शिल्पकार म्हणून त्यांनी पार पाडलेली कामगिरी जगाच्या इतिहासात अविस्मरणीय आहे. दोन वर्षे अकरा महिने सतरा दिवस सतत अभ्यास आणि चर्चा करून जगातील उत्तम असे संविधान निर्माण करण्यात आले. त्यामध्ये त्यांचा वाटा सिंहाचा होता, हे कोणालाही नाकारता येणार नाही. हिंदू कोड बिल आणि संविधानातील तरतुदी यांच्या माध्यमातून स्त्रियांच्या हक्कांचे ते उद्गातेच ठरतात. स्त्रियांची गुलामगिरी ही जातीव्यवस्थेशीही निगडीत असल्याचा त्यांचा सिद्धांत अतिशय महत्त्वाचा ठरला आहे. स्त्रियांच्या हक्कांसाठी व ओबीसींच्या हक्कांसाठी कायदेमंत्रिपदाचा राजीनामा देणारा डॉ. आंबेडकरांसारखा नेता विरळाच!

डॉ. आंबेडकरांनी अर्थशास्त्रावर मुख्य तीन ग्रंथ लिहिले. 'ॲडमिनिस्ट्रेशन अँड फायनान्स ऑफ ईस्ट इंडिया कंपनी', 'इव्होल्यूशन ऑफ प्रोव्हिन्शियल फायनान्स इन ब्रिटिश इंडिया' आणि 'दि प्रॉब्लेम ऑफ रूपी : इट्स ओरिजिन अँड सोल्युशन' हे तीन ग्रंथ त्यांच्या अनुक्रमे एम. ए., पीएच. डी. आणि डॉक्टर ऑफ सायन्स या तीन पदव्यांसाठी लिहिलेले प्रबंध होते. अत्यंत महत्त्वाच्या विषयावर ते लिहिलेले आहेत. 'एनिहिलेशन ऑफ कास्ट'मध्ये जातीचे अर्थशास्त्र; 'व्हॉट काँग्रेस अँड गांधी डिड टू अनटचेबल्स' या ग्रंथामध्ये अस्पृश्यतेचे अर्थकारण, तर 'बुद्धिझम अँड कम्युनिझम' यातील राज्यसंस्था आणि समाजरचना यांचे राजकीय अर्थशास्त्रीय विश्लेषण हे त्यांचे लेखन त्यांनी 'बहुजन हिताय बहुजन सुखाय' या स्थायी भावाने केले असले, तरी त्यांचे अर्थशास्त्रीय लेखन हे सर्व देशाला समोर ठेवून व्यापक अर्थाने केल्याचे दिसून येते.

समाजरचना, राज्यसंस्था, शासनव्यवस्था, लोकशाही, कायदे, संविधानशास्त्र, शिक्षण, शेती, कामगार, विद्यार्थी, शिक्षण अशा अनेकविध विषयांवर त्यांनी विपुल लेखन केले आहे. व्याख्याने दिली आहेत. अपरिमित स्वातंत्र्य समतेचा नाश करते. त्यामुळे स्वातंत्र्य अबाधित राखून समता निर्माण केली पाहिजे, असे त्यांना वाटते. हुकूमशाही नाकारणारा शासकीय समाजवाद त्यांना अभिप्रेत होता. 'रक्ताचा एकही थेंब न सांडता मूलभूत परिवर्तन घडविणारी राज्यव्यवस्था म्हणजे लोकशाही' अशी लोकशाहीची व्याख्या डॉ. आंबेडकर यांनी केली आहे. हे त्यांचे लोकशाही विचाराला मूलभूत योगदान होय. समाजकारण, धर्मकारण, राजकारण आणि पत्रकारिता अशा विविध क्षेत्रांमध्ये त्यांनी कार्य केले असले, तरी ते मुळात अर्थतज्ज्ञ होते. त्यांचे समाजशास्त्र, मानववंशशास्त्र, इतिहास, वाणिज्य अशा विविध विषयांचे ज्ञान प्रेरणादायक आहे. विधिमंडळ, संविधान सभा, संसद अशा सर्वच सभागृहांत त्यांनी केलेली भाषणे, दिलेले दाखले व स्पष्टीकरण ज्ञानाने ओतप्रोत भरलेले दिसून येतात.

डॉ. आंबेडकरांनी जे शिक्षण घेतले, ते फक्त पदव्या मिळवण्यासाठी नाही, तर त्यांनी आपल्या या ज्ञानाचा उपयोग समाजाच्या व्यापक हितासाठी करून दिला. विविध ज्ञानशाखांमध्ये लीलया विहार करणारे डॉ. आंबेडकर प्रत्येक प्रश्नाचे, समस्येचे तार्किक विश्लेषण करताना दिसतात आणि शास्त्रीयदृष्ट्या स्पष्टीकरण करतात. त्यामुळे आपला मुद्दा पटवून देणे आणि सार्वत्रिक हितास्तव तो मान्य करून घेणे त्यांना शक्य झाले. बुद्धीकौशल्याचा आणि त्यांच्या विशाल प्रज्ञेचा प्रत्यय आपल्याला त्यांच्या जीवनकार्यात पदोपदी येतो.

स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय या तत्त्वांवर आधारित समाजाची निर्मिती झाली पाहिजे, यासाठी केलेला अविरत संघर्ष यशस्वी झाला. यामागे जसे त्यांचे अथक परिश्रम होते, तसेच प्रचंड ज्ञानाचे आणि अचाट पांडित्याचे उपयोजन त्यासाठी महत्त्वपूर्ण ठरले. मानवमुक्तीच्या लढ्याच्या योद्ध्याचे ज्ञान हेच शस्त्र ठरले आणि त्यासाठीच जगाने त्यांना ज्ञानाचे प्रतीक (Symbol of Knowledge) म्हटले आहे. या अनन्य ज्ञानसूर्यास विनम्र अभिवादन!

**- प्रा. डॉ. श्रीकृष्ण महाजन**

14 APR 2022

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# भगवान महावीरांची अष्ट आचारसूत्री

**भगवान महावीरांनी आचाराची अष्टसूत्रे या स्वरूपात दिलेले विचार सद्यस्थितीत अत्यंत महत्त्वाचे असून प्रत्येकाने जर आपल्या आचरणात ही सूत्रे शक्य तेवढ्या प्रमाणात अंमलात आणल्यास विश्वशांती प्रस्थापित होऊ शकेल. आज महावीर जयंती, त्यानिमित्त...**

भगवान महावीर यांनी आपले जीवन कल्याणप्रद होण्यासाठी सांगितलेली सूत्रे ही आचरणाची किंवा जीवन जगण्याची जीवनसूत्रे आहेत. यातील ५ जीवनसूत्रे ही सकारात्मक, तर ३ जीवनसूत्रे ज्या गोष्टी टाळणे आवश्यक आहे, अशा नकारात्मक बाबीशी निगडीत आहेत.ईर्या, भाषा, एषणा, आदान व उत्सर्ग हे पाच सक्रिय तत्त्वे तन मनोगुप्ती, वचनगुप्ती व कायागुप्ती ही ३ अशी आठ नियम चौकट दिली आहे.

भगवान महावीरांनी ईर्या तत्त्व जाणीव जागृतेशी जोडले असून कोणतीही कृती अज्ञानातून, सवयीचा भाग म्हणून न करता स्वजाणीव जागृत ठेवून करण्याचे आहे. बोधावस्था न ठेवता केलेले पुण्य अथवा दान हे व्यर्थ असते. कोणतीही कृती आत्म्यास किंवा स्वजाणीवेस साक्षी ठेवून केल्यानेच आपण योग्य वाटचाल करू शकतो. जाणीवपूर्वक कृती नसेल, तर आपण एखाद्या नशेत जीवन जगतो. खरे तर प्रत्येकजण आत्मभान किंवा ईर्या विसरून कोणत्याही एका नशेच्या आहारी जगत असतो. एखादा धनाच्या नशेत धनसंचय यालाच जीवन समजतो, तर दुसरा सत्ता हेच सगळे समजून सत्तेच्या नशेत राहतो, तर एखाद्यास सौंदर्याची नशा असते. प्रसिद्धीचा हव्यास हे पण नशेचाच प्रकार असून त्यासाठी कोणत्याही मार्गाचा अवलंब करण्यास ती व्यक्ती तयार असते. यातील नशा कमी झाली की ती व्यक्ती जीवनकार्य समजू लागते. नशेतून जागे होऊन आपले मूळ स्वरूप जाणून व्यवहार केल्यास पाप घडूच शकत नाही. हे सर्व कशासाठी, या प्रश्नाचे उत्तर न शोधल्याने सर्व जीवन धावपळ, स्पर्धा, संचय यात संपून जाते. जाणीवपूर्वक कृती करण्याचे सूत्र सर्व इतर सूत्रांपेक्षा मोठे असून ते केवळ एक जरी पूर्णतः अंमलात आणले, तरी आपण महावीरांच्या महामार्गाचे पांथस्थ होऊ शकतो.



भाषा किंवा शब्दवापर, संभाषण हे दुसरे महत्त्वाचे आचरण सूत्र असून अनेकवेळा भाषेचा योग्य वापर न केल्याने आपण आपले व इतरांचे नुकसान करतो. मृदू भाषा, सत्य वक्तव्य, योग्यवेळी केलेले वक्तव्य हेच आचरणसूत्र असले पाहिजे. भाषेतून आपण इतरांशी तर मौनातून स्वतः 'शी संवाद साधत असतो. इतरांशी संवाद साधताना बोलणे आवश्यक आहे का? ज्याच्याशी बोलणार ती ऐकण्यास तयार आहे का? जे बोलणार ते सत्य आहे का व हितकारक आहे का, हे प्रश्न प्रथम आपणास विचारून भाषा वापरावी. केवळ बोलण्यासाठी बोलणे, इतरांना त्रास होईल, नुकसान होईल असे टाळणे हे आचरण आपणास भाषा वापराचे निकष पूर्ण केले व जिनसूत्र वापरले असे समाधान देते. 'मीठा बोलो, कम बोलो, धीरे बोलो' हे वचन भाषा आचारसूत्राचाच छोटा भाग आहे.

आचारसूत्रातील तिसरे सूत्र ऐषणा किंवा भोगाची अपेक्षा आहे. शरीरास आवश्यक अन्न, वस्त्र व इतर बाबी आवश्यक तेवढ्या प्रमाणातच देणे हे आदर्श सूत्र आहे. याचाच अर्थ आपणास एक वेळ भोजन पुरेसे असेल, तर दोन वेळा न घेणे. चार तास झोप पूरक असेल, तर त्यापेक्षा अधिक न घेणे, यातून भोग हे जीवनास आवश्यक तेवढे घेणे हे योग्य. तथापि, भोगासाठीच जगणे, अती भोगातून तृप्ती नाही, तर अतृप्ती आणि आजार यांना आमंत्रण असते. भूकबळीपेक्षा अतिप्रमाणात खाऊन आजारी पडणारे, मरणारे अधिक आहेत, हे वास्तव आहे.

आदान किंवा स्वीकृतीबाबतचे चौथे सूत्र हे आवश्यक व उचित असेल तेवढेच स्वीकारण्याबाबतचे आहे. केवळ प्राप्त होते म्हणून स्वीकारणे हे हव्यासालाच जन्म देते. पशू, पक्षी ज्याप्रमाणे हवे तेवढेच घेतात, संग्रह करीत नाहीत, तसेच आपणही गरजेपुरते स्वीकारून उर्वरित नाकारले पहिजे. असे केल्याने वस्तू, सेवा ज्यांना गरज आहे त्यांना उपलब्ध होईल. वैचारिक आदान स्वीकृतीसही हे लागू पडते.

आपण जेवढे घेतो त्याचे उत्सर्जन करीत असल्याने पाचवे सूत्र हे उत्सर्जनाबाबत पाळावयाची शूचिता यासंबंधी आहे. आपल्या मल, मूत्राचेच नव्हे, तर घेतलेल्या श्वासाचे उत्सर्जन करीत असताना कोणासही त्याचा त्रास होऊ नये, अशी काळजी घेतली पाहिजे. जैन मुनी मुखावर मुखपट्टी वापरतात याचे कारण श्वासोच्छवासातूनही सूक्ष्म जीवांची हानी होत असते. नेहमीच्या व्यावहारिक पातळीवरही आपणास प्राप्त झालेली माहिती, बातमी तत्काळ कोणास तरी सांगण्याची तीव्र इच्छा होते. तेथेही उत्सर्जनाचे आचारसूत्र पाळले पाहिजे. अनेक विवाद, गैरसमज संघर्ष याचे सूत्र अपुरी, चुकीची, पडताळून न पाहिलेली माहिती दुसऱ्यास दिल्याने होत असते. सामाजिक शांतता व सलोखा याचा संबंध उत्सर्जन आचारसूत्रात आहे.

मनोगुप्ती, वचनगुप्ती आणि काया गुप्ती हे तीन निग्रहाचे आचार धर्म असून या न करण्याच्या कृतीशी संबंधित असल्याने त्यांना वेगळ्या गटात समाविष्ट केले आहे. मनोगुप्ती ही मनावर, विचारावर नियंत्रण ठेवणे यासंबंधित आहे. मनाचा निग्रह हा अनेक सकारात्मक बाबीचा पाया व नकारात्मक बाबीचा प्रारंभ ठरतो. मनोनिग्रह हा सहावा आचारधर्म ठरतो.

वचनगुप्ती यामध्ये वचन किंवा शब्द यांचा निग्रह नियंत्रण समाविष्ट आहे. शब्दांचा वापर दोन व्यक्तींमध्ये संबंध प्रस्थापित करतो. ऐकणाऱ्याने तो नीट स्वीकारला नाही, तर सांगणाऱ्याने चांगले सांगितले, तरी गैरसमज होण्याची शक्यता असते. अकारण संभाषण करणे, अपुऱ्या माहितीच्या आधारे होणारे बोलणे न करणे हा वचनगुप्तीचा अर्थ आहे. अहितकारक, अवेळी, कटुवचने जर निग्रहपूर्वक आपण टाळली, तर आपले व इतरांचे निश्चितच नुकसान टाळले जाते. वचनगुप्तीची आवश्यकता सध्याच्या माहितीतंत्राच्या आधारे होत असलेल्या संवादास अधिक लागू पडते, हे सातवे आचारसूत्र आता प्रकर्षाने सर्वांनी स्वीकारणे गरजेचे आहे.

कायागुप्ती हे आठवे आचारसूत्र आपले शरीर निग्रहपूर्वक नियंत्रणात ठेवण्याचे आहे. शरीर हे साधन असून त्याचा वापर संयतपणे करीत जीवन जगणे यामध्ये अभिप्रेत आहे. शरीराचे अनावश्यक पोषण न करता त्याची आरोग्यपूर्ण देखभाल कायागुप्तीचा भाग ठरतो. आत्मभान जागे ठेवून भाषेचा समूचित वापर करीत, भोगास मर्यादा घालून आपले घेणे व देणे संतुलित करीत मनोगुप्ती, वचनगुप्ती व कायागुप्ती साधली, तरी महावीरांची जीवनचर्या आपणही साध्य करू शकतो.

- प्रा. विजय ककडे

14 APR 2022

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# डॉ. डी. वाय. पाटील यांच्यामुळे आधुनिक शिक्षण बहुजन समाज घटकांपर्यंत

## श्रीमंत शाहू छत्रपती महाराज : शिवाजी विद्यापीठाचा 'प्राचार्य डॉ. रा. कृ. कणबरकर पुरस्कार' डॉ. डी. वाय. पाटील यांना प्रदान

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

'पद्मश्री' डॉ. डी. वाय. पाटील यांनी बहुजन समाज घटकांत आधुनिक शिक्षण वृद्धीचे मोलाचे कार्य केले, असे गौरवोद्‌गार श्रीमंत शाहू छत्रपती महाराज यांनी काढले. शिवाजी विद्यापीठातर्फे देण्यात येणारा सन २०२२ साठीचा 'प्राचार्य रा. कृ. कणबरकर पुरस्कार' श्रीमंत शाहू महाराज यांच्या हस्ते बुधवारी 'पद्मश्री' डॉ. डी. वाय. पाटील यांना प्रदान करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते.

विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात झालेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते, तर प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, शांतादेवी डी. पाटील आणि डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठाचे कुलपती डॉ. संजय डी. पाटील प्रमुख उपस्थित होते.

यावेळी श्रीमंत छत्रपती शाहू महाराज यांच्या हस्ते डॉ. डी. वाय. पाटील यांना 'प्राचार्य डॉ. रा. कृ. कणबरकर पुरस्कार' प्रदान करण्यात आला. शाल, श्रीफळ, मानपत्र, स्मृतिचिन्ह आणि रुपये १ लाख ५१ हजार रोख असे पुरस्काराचे स्वरूप होते. डॉ. अरुण कणबरकर यांनी कणबरकर कुटुंबीयांच्या वतीने डॉ. पाटील यांचा सत्कार केला, तर डॉ. नमिता खोत यांनी शांतादेवी पाटील यांचा सत्कार केला.

डॉ. डी. वाय. पाटील यांच्या कारकिर्दीचे आपण गेल्या साठ वर्षांहून अधिक कालखंडाचे साक्षीदार असल्याचे सांगून श्रीमंत शाहू छत्रपती महाराज म्हणाले, डॉ. पाटील हे शहाजी महाराजांना भेटावयास येत असत, तेव्हापासूनचा आमचा स्नेह आहे. राजकारणापासून अलिप्त होऊन शैक्षणिक कार्य करण्याचा निर्णय खूप मोठा होता. मात्र, त्यांनी तो धाडसाने घेतला आणि त्यांच्या या कार्याचा लौकिक केवळ देशातच नव्हे, तर आंतरराष्ट्रीय स्तरापर्यंतही विस्तारला आहे. शिवाजी विद्यापीठाने त्यांना डी.लिट.सह कणबरकर पुरस्कार देऊन त्यांच्या कार्याचा यथोचित सन्मान केला आहे.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचा 'प्राचार्य रा. कृ. कणबरकर पुरस्कार' पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील यांना प्रदान करताना श्रीमंत शाहू छत्रपती महाराज, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. सोबत प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, शांतादेवी डी. पाटील आणि प्राचार्य बी. ए. खोत.

सत्काराला उत्तर देताना डॉ. डी. वाय. पाटील म्हणाले, प्राचार्य कणबरकर हे माझे गुरू आहेत. गुरुंच्या नावे असणारा पुरस्कार मला मिळाला, यामुळे उपकृततेची भावना मनी दाटली आहे. त्यामुळेच अन्य पुरस्कारांपेक्षा हा पुरस्कार माझ्यासाठी खूप वेगळा आणि जवळचा आहे. पूर्वी गुरुदक्षिणा दिली जायची; पण आज गुरूकडून शिष्याचा सन्मान झाला आहे, हे या पुरस्काराचे वेगळेपण आहे.

यावेळी डॉ. डी. वाय. पाटील यांनी पुरस्काराच्या १ लाख ५१ हजार रुपयांच्या रकमेत आणखी १० लाखांची भर घालून तो निधी विद्यापीठाकडे सुपूर्द करण्याची घोषणा केली. या निधीमधून संत साहित्याच्या क्षेत्रात प्रभावी काम करणाऱ्या व्यक्तींसाठी पुरस्कार योजना निर्माण करावी, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. यावेळी डॉ. पाटील यांच्या हस्ते ११ लाख ५१ रुपये इतक्या निधीचा धनादेश कुलगुरू डॉ. शिर्के यांच्याकडे सुपूर्द करण्यात आला.

अध्यक्षीय मनोगतात कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, डॉ. डी. वाय. पाटील हे शिवाजी विद्यापीठाचे विद्यार्थी तर आहेतच, शिवाय विद्यापीठाचे अधिसभा सदस्य, विद्यापीठाचे मानद डी.लिट.धारक व्यक्तिमत्त्व आणि आता त्यांचे शिक्षक असलेल्या कुलगुरूंच्या नावाचा पुरस्कार प्राप्त झाल्याने या विद्यापीठाशी त्यांचे असणारे दृढ नातेच अधोरेखित होते. डॉ. पाटील आणि डॉ. कणबरकर कुटुंबीय यांच्यामध्ये दातृत्वाचा आणि त्यागाच्या संस्काराचा एक धागा दिसतो. आजचा समारंभ या दोन कुटुंबीयांच्या दातृत्वातून साजरा झाला आहे. डॉ. पाटील यांनी व्यक्त केलेल्या अपेक्षेची पूर्ती विद्यापीठातर्फे करण्यात येईल, याची ग्वाही अधिकार मंडळांच्या वतीने कुलगुरूंनी दिली.

तत्पूर्वी, कार्यक्रमाची सुरुवात डॉ. कणबरकर यांच्या प्रतिमा पूजनाने झाली. डॉ. प्राचार्य कणबरकर आणि डॉ. डी. वाय. पाटील यांच्या जीवनकार्यावरील ध्वनिचित्रफिती दाखविण्यात आल्या. मराठी अधिविभागाचे प्रमुख डॉ. रणधीर शिंदे यांनी डॉ. पाटील यांना प्रदान करावयाच्या मानपत्राचे वाचन केले. प्राचार्य डॉ. बी. ए. खोत यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी आभार मानले. नंदिनी पाटील व धैर्यशील यादव यांनी सूत्रसंचालन केले.

कार्यक्रमास माजी कुलगुरू डॉ. बी. पी. साबळे, डॉ. जे. एफ. पाटील, डॉ. बी. एम. हिर्डेकर, डॉ. डी. आर. मोरे यांच्यासह विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषद, विद्यापरिषद तसेच अधिसभा यांचे सदस्य, डॉ. डी. वाय. पाटील समूहाचे पदाधिकारी, शिक्षक, प्रशासकीय सेवक, कणबरकर कुटुंबीय आणि डॉ. पाटील यांच्यावर प्रेम करणारे उपस्थित होते.

14 APR 2022
पुण्यनगरी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# धर्मव्यवस्थेच्या नावाखाली स्त्री बंधनात

## डॉ. मेघा पानसरे : शिक्षण विभागातर्फे महिला जागृती शिबिराचे आयोजन

गारगोटी : प्रतिनिधी

१९८० नंतर स्त्रियांच्या आत्मविश्वासाचे खच्चीकरण केले गेले असून, व्यवस्थेला स्त्रियांनी प्रश्न विचारायचे नाहीत, अशी मानसिकता तयार केली गेली आहे. आजच्या मुलींचे आदर्श कोण आहेत, याचा विचार करण्याची वेळ आली आहे. आजच्या समाजव्यवस्थेने धर्मव्यवस्थेच्या नावाखाली स्त्रीला बंधनात अडकवले आहे, असे परखड मत रशियन भाषा व संस्कृती या विषयाच्या अभ्यासिका डॉ. मेघा पानसरे यांनी व्यक्त केले.

शिक्षण विभाग भुदरगड यांच्या वतीने समृद्ध शिक्षक अभियानांतर्गत डॉ. डी. वाय. पाटील शैक्षणिक संकुल, गारगोटी येथे आयोजित महिला शिक्षक आत्मभान जागृती शिबिरात त्या प्रमुख वक्त्या म्हणून बोलत होत्या. महिला दक्षता समिती, कोल्हापूरच्या सचिव तनुजा शिपूरकर प्रमुख पाहुण्या होत्या. पानसरे म्हणाल्या, स्त्रिया या देशाच्या अर्ध्या नागरिक आहेत, त्यामुळे त्यांची जबाबदारी ही शासनाने घेतली पाहिजे. स्त्रीला शिक्षणाची संधी ही सहज व मोफत मिळाली पाहिजे. तनुजा शिपूरकर यांनी आपल्याकडे सुजाण पालकत्वाचा अभाव दिसून येत असून, स्त्रीचा प्रवास हा दिशाहीन झाला आहे, असे मत व्यक्त केले.

आजची शिकलेली स्त्री, त्यांची ही अपेक्षा पूर्ण करताना दिसते का, याचं चिंतन व्हावं आणि शिकलेल्या स्त्रीचं आत्मभान जागृत व्हावं या उद्देशाने भुदरगड तालुक्यातील सर्व प्राथमिक व माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळांतील महिला शिक्षकांसाठी या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.



गारगोटी : महिला आत्मभान जागृती शिबिरात बोलताना डॉ. मेघा पानसरे. व्यासपीठावर तनुजा शिपूरकर, विजयराव घोलपे, दीपक मेंगाणे आदी.

याप्रसंगी बिद्रीचे संचालक मधूअप्पा देसाई, माजी सभापती स्नेहल परीट, विजयराव घोलपे, गटशिक्षणाधिकारी दीपक मेंगाणे, विस्ताराधिकारी प्रबोध कांबळे, केंद्रप्रमुख संजय कुकडे, मुख्याध्यापक एन. जी. कांबळे, वळीवडे, प्रा. सुधीर गुरव, शिक्षक एस. पी. पाटील व तालुक्यातील सर्व महिला शिक्षिका उपस्थित होत्या.

14 APR 2022

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर




कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातर्फे बुधवारी डॉ. रा. कृ. कणबरकर पुरस्काराने पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील यांना सन्मानित करताना श्रीमंत शाहू छत्रपती महाराज. शेजारी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. पी. एस. पाटील, शांतादेवी पाटील, प्राचार्य बी. ए. खोत.
(मोहन मेस्त्री : सकाळ छायाचित्रसेवा) (बातमी पान २ वर)

# गुरुच्या नावाचा पुरस्कार मिळणे, हेच वेगळेपण

## पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील; प्राचार्य डॉ. रा. कृ. कणबरकर पुरस्कार डॉ. डी. वाय. पाटील यांना प्रदान

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. १४ : 'प्राचार्य डॉ. रा. कृ. कणबरकर माझे गुरू आहेत. गुरुंच्या नावाचा पुरस्कार शिष्याला मिळाला, हे पुरस्काराचे वेगळेपण आहे. पूर्वी शिष्याकडून गुरुदक्षिणा दिली जात होती. आज गुरुकडून शिष्याचा सन्मान झाल्याची माझी भावना आहे,' असे प्रतिपादन माजी राज्यपाल, पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील यांना आज येथे केले.

शिवाजी विद्यापीठातर्फे देण्यात येणारा प्राचार्य डॉ. रा. कृ. कणबरकर पुरस्कार श्रीमंत शाहू महाराज छत्रपती यांच्या हस्ते डॉ. डी. वाय. पाटील यांना प्रदान केला. शाल श्रीफळ मानपत्र स्मृतिचिन्ह, १ लाख ५१ हजार रुपये असे पुरस्काराचे स्वरूप होते. या वेळी ते बोलत होते. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी होते.

श्रीमंत शाहू महाराज म्हणाले, ''डॉ. डी. वाय. पाटील यांच्या कारकिर्दीचा साठ वर्षांहून अधिक काळाचा मी साक्षीदार आहे. राजकारणापासून अलिप्त होत शिक्षण क्षेत्रात येण्याचा त्यांचा धाडसी निर्णय होता. त्यांच्या शिक्षण संस्था विनाअनुदानित असल्या तरी उत्तम शिक्षण देण्याबाबत तडजोड केल्याचे दिसत नाही, हे त्यांचे वैशिष्ट्य आहे.''

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, ''डॉ. डी. वाय. पाटील शिवाजी विद्यापीठाचे विद्यार्थी आहेत. अधिसभा सदस्य, मानद डीलिटधारक व्यक्तिमत्त्व आहे. आज त्यांना त्यांचे शिक्षक व कुलगुरू यांच्या नावाचा पुरस्कार लाभला. विद्यापीठाशी त्यांचे असलेले नाते अधिक दृढ झाले आहे. डॉ. पाटील व डॉ. कणबरकर कुटुंबामध्ये दातृत्व, त्याग व संस्काराचा धागा दिसत आहे.''

डॉ. अरुण कणबरकर यांनी कणबरकर कुटंबीयांतर्फे डॉ. पाटील यांचा सत्कार केला. डॉ. नमिता खोत यांच्या हस्ते शांतादेवी पाटील यांचा सत्कार झाला.

प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील. डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठाचे कुलपती डॉ. संजय डी. पाटील, माजी कुलगुरू डॉ. बी. पी. साबळे, डॉ. जे. एफ. पाटील, डॉ. बी. एम. हिर्डेकर आदी उपस्थित होते.



### पुरस्काराची रक्कम विद्यापीठास

डॉ. डी. वाय. पाटील यांनी १ लाख ५१ हजार रुपये पुरस्काराच्या रकमेत स्वतःचे दहा लाख रुपये घालून तो निधी शिवाजी विद्यापीठाला देत असल्याची घोषणा केली. निधीतून संत साहित्यक्षेत्रात प्रभावी काम करणाऱ्या व्यक्तींना पुरस्कार देण्याची योजना विद्यापीठाने राबवावी, अशी अपेक्षा डॉ. पाटील यांनी व्यक्त केली.

14 APR 2022 सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# धर्मव्यवस्थेच्या नावाखाली स्त्रिया बंधनात : डॉ. मेघा पानसरे

## गारगोटीत शिक्षण विभागातर्फे महिला जागृती कार्यक्रम



गारगोटी : शिक्षण विभागातर्फे आयोजित कार्यक्रमात बोलताना डॉ. मेघा पानसरे. शेजारी तनुजा शिपूरकर, विजयराव घोलपे, दीपक मेंगाणे आदी.

गारगोटी, ता. १३ : आजच्या समाज व धार्मिक व्यवस्थेच्या नावाखाली स्त्रियांना बंधनात अडकवले आहे. अनेक कारणांनी स्त्रियांच्या आत्मविश्वासाचे खच्चीकरण केले असून व्यवस्थेला स्त्रियांनी प्रश्न विचारायचे नाहीत, अशी मानसिकता तयार केली गेली आहे. यामुळे आजच्या मुलींचे आदर्श कोण आहेत? याचा विचार करण्याची वेळ आली आहे, असे परखड मत रशियन भाषा व संस्कृती या विषयाच्या अभ्यासिका डॉ. मेघा पानसरे यांनी व्यक्त केले.


येथील पंचायत समितीच्या शिक्षण विभागातर्फे आयोजित समृद्ध शिक्षक अभियानांतर्गत 'महिला शिक्षक आत्मभान जागृती' कार्यक्रमात त्या प्रमुख वक्त्या म्हणून बोलत होत्या. महिला दक्षता समितीच्या सचिव तनुजा शिपूरकर प्रमुख पाहुण्या होत्या. डॉ. डी. वाय. पाटील शैक्षणिक संकुलात कार्यक्रम झाला.

तनुजा शिपूरकर यांनी आपल्याकडे सुजाण पालकत्वाचा अभाव दिसून येत असून स्त्रीचा प्रवास हा दिशाहीन झाला आहे, असे मत व्यक्त केले.

गटशिक्षणाधिकारी दीपक मेंगाणे यांनी स्वागत केले. ''बिद्री'' चे संचालक मधुकर देसाई, स्नेहल परीट, विजयराव घोलपे, विस्ताराधिकारी प्रबोध कांबळे,

केंद्रप्रमुख संजय कुकडे, मुख्याध्यापक एन. जी. कांबळे, श्री. वळिवडे, प्रा. सुधीर गुरव, शिक्षक एस. पी. पाटील, राजू शिंदे, सुरेश कांबळे, सागर मोरे आदी उपस्थित होत्या. एस. एस. कारेकर, वनिता मोरुस्कर यांनी सूत्रसंचालन केले. दीपलता देवाळे यांनी आभार मानले.

तरूण भारत




कोल्हापूर : प्राचार्य कणबरकर पुरस्कार डॉ. डी. वाय. पाटील यांना प्रदान करताना छत्रपती शाहू महाराज, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. सोबत कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, शांतादेवी डी. पाटील, प्राचार्य बी. ए. खोत.

# डी. वाय. पाटील यांचे शैक्षणिक कार्य विश्वस्तरावर

- शाहू महाराज छत्रपती यांचे प्रतिपादन
- प्राचार्य रा. कृ. कणबरकर पुरस्काराने सन्मान

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

राजकारणातून निवृत्ती घेतल्यानंतर डॉ. डी. वाय. पाटील यांनी शैक्षणिक क्षेत्रात कार्य सुरु केले. राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पातळीवर शिक्षण संस्थांची स्थापना करून सामान्यांच्या मुलांना शिक्षणाची दारे खुली केली. विद्यादानातील त्यांचे कार्य विश्वस्तरावर पोहोचले आहे, असे गौरवोद्गार श्रीमंत छत्रपती शाहू महाराज यांनी काढले.

डी. वाय. पाटील यांना सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, सहकारातील कार्याचा गौरव म्हणून त्यांना डी. लिट. पदवीसह प्राचार्य रा. कृ. कणबरकर पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. १ लाख ५१ हजार रुपये रोख, स्मृतिचिन्ह, शाल, श्रीफळ असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. या सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते. शांतादेवी पाटील यांचा सत्कार डॉ. नमिता खोत यांनी केला.

डॉ. पाटील यांनी पुरस्कार स्वीकारल्यानंतर लगेच या रकमेमध्ये भर घालून तब्बल ११ लाख ५१ हजार रुपये शिवाजी विद्यापीठास देत असल्याचे जाहीर करत या रकमेतून संत साहित्याच्या अभ्यासकाला पुरस्कार देण्यात यावा, अशी अपेक्षा व्यक्त केली. तसेच आपल्या गुरुच्या नावाने मिळालेला पुरस्कार आनंददायी असल्याचेही म्हटले आहे.

पान ६ पहा

## ११ लाख ५१ हजार रुपयांची देणगी...

गुरुदक्षिणा देण्याची प्रथा असताना शिवाजी विद्यापीठाने माझ्या गुरूच्या नावाने मला पुरस्कार दिला, ही माझ्यासाठी आनंदाची गोष्ट आहे. पुरस्काराच्या रकमेसह मी ११ लाख ५१ हजार रुपयांची देणगी धनादेशाच्या स्वरूपात विद्यापीठाला देत आहे. त्यातून त्यांनी संत साहित्याच्या अभ्यासकाला पुरस्कार द्यावा. असे सांगत ११ लाख ५१ हजार रुपयांचा धनादेश डॉ. डी. वाय. पाटील, शांतादेवी डी. पाटील आणि डी. वाय. पाटील विद्यापीठाचे कुलपती डॉ. संजय डी. पाटील यांनी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्याकडे सुपुर्द केला.

तरुण भारत

# डी. वाय. पाटील यांचे शैक्षणिक कार्य विश्वस्तरावर

पान १ वरून

यावेळी शाहू महाराज म्हणाले, माजी कुलगुरू रा. कृ. कणबरकर यांचे शिवाजी विद्यापीठाच्या विकासात मोठे योगदान आहे. डॉ. डी. वाय. पाटील यांना कणबरकर पुरस्कार दिल्याने दोघांच्याही कार्याचा यथोचित गौरव झाला आहे. डी. वाय. पाटील विद्यापीठ आणि शिवाजी विद्यापीठाने जागतिक पातळीवरील संशोधनाचे मानांकन मिळवून आपल्या लौकिकामध्ये भर घातल्याचेही ते म्हणाले.

कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, प्राचार्य कणबरकर यांनी अध्यापनाचे काम केलेल्या सर्व महाविद्यालयांना स्वायत्त दर्जा मिळाला आहे. विद्यापीठाचे कुलगुरू म्हणून त्यांनी केलेले काम अतुलनीय आहे. डी. वाय. पाटील यांनी दिलेल्या देणगीच्या रकमेतून संत साहित्याच्या अभ्यासकाला पुरस्कार दिला जाईल, अशी ग्वाहीही त्यांनी दिली. प्रास्ताविक प्राचार्य बी. ए. खोत यांनी केले. सूत्रसंचालन नंदिनी पाटील व धैर्यशील यादव यांनी केले. आभार प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी केले.

तरुण भारत



कोल्हापूर :स्वप्नजीत मुळीक यांना सर्वोत्कृष्ट संशोधन प्रकल्प पुरस्कार मिळाल्याबद्दल अभिनंदन करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील. सोबत डॉ. एस. बी. महाडीक, डॉ. केदार मारूलकर, डॉ. कविता वड्राळे, डॉ. आर. के. कामत, डॉ. जगन कराडे, डॉ. सागर डेळेकर.

# स्वप्नजीत मुळीक यांना 'अन्वेषण' स्पर्धेत संशोधन प्रकल्प पुरस्कार

▪ शिवाजी विद्यापीठाकडून सत्कार

प्रतिनिधी
कोल्हापूर

भारतीय विद्यापीठ संघटना (दिल्ली) आणि सागरी शिक्षण व प्रशिक्षण ॲकॅडमी (चेन्नई) यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय स्तरावरील आयोजित अन्वेषण या स्पर्धमध्ये स्वप्नजीत मुळीक यांना सर्वोत्तम संशोधन प्रकल्प पुरस्कार प्राप्त झाला आहे. या स्पर्धमध्ये मुळीक यांनी विविध 'नॅनो सॅमिश्रेच्या वापरातून अतिशय कार्यक्षम सुपरकपॅसिटरची निर्मिती' या विषयावरती संशोधन प्रकल्प सादर केला होता. विद्यापीठातील प्रा. सागर डेळेकर यांच्या मार्गदर्शनाखाली प्रकल्प केला आहे.

सुलभ पद्धतीने नॅनो समिश्रे तयार करणे, तसेच कार्यक्षम ऊर्जा साठवणुकीसाठी आवश्यक सुपरकपॅसिटर निर्मिती ही दोन्ही कामे अत्यंत कमी खर्चामध्ये तयार केली असून ही त्याच्या संशोधनाची मुख्य वैशिष्टये आहेत. स्पर्धेमध्ये देशभरातील विविध आयआयटी, राष्ट्रीय प्रयोगशाळेमधील जवळपास २०० संशोधकांनी विविध प्रकल्पाचे सादरीकरण केले होते. यातून मुळीक यांना द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाले आहे. त्याच्या या विशेष कामगिरीमुळे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्रा. पी. एस. पाटील यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे. समन्वयक डॉ. एस. बी. महाडीक, डॉ. केदार मारूलकर, डॉ. कविता वड्राळे यांनी विशेष परिश्रम घेतले. डॉ. आर. के. कामत, डॉ. जगन कराडे, डॉ. सागर डेळेकर उपस्थित होते.

तरुण भारत

# मराठी समाजशास्त्र परिषदेकडून डॉ. कराडे यांना पुरस्कार



रत्नागिरी : येथील मराठी समाजशास्त्र परिषदेतर्फे डॉ. जगन कराडे यांना पुरस्कार प्रदान करताना डॉ. पी. जी. जोगदंड. सोबत प्राचार्य डॉ. पी. पी. कुलकर्णी, परिषदेचे अध्यक्ष डॉ. नारायण कांबळे.

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या समाजशास्त्र अधिविभागाचे प्रमुख डॉ. जगन कराडे यांना मराठी समाजशास्त्र परिषदेचे दोन पुरस्कार प्राप्त झाले आहेत. रत्नागिरी येथे हा पुरस्कार नुकताच कराडे यांना ज्येष्ठ समाजशास्त्रज्ञ डॉ. पी. जी. जोगदंड यांच्याहस्ते प्रदान करण्यात आला.

मराठी समाजशास्त्र परिषदेने या वर्षापासून महाराष्ट्रातील समाजशास्त्र या विषयात शैक्षणिक भर घालणाऱ्या प्राध्यापकास डॉ. प्रदीप आगलावे उत्कृष्ट संशोधक/ प्राध्यापक पुरस्कार तसेच आयसीएसएसआर व विद्यापीठ अनुदान आयोग पुरस्कृत संशोधक ग्रंथास डॉ. सूर्यकांत घुगरे संशोधक ग्रंथ पुरस्कार देण्यात येत आहे. पहिल्या पुरस्कारासाठी स्वतः डॉ. कराडे तर दुसऱ्या पुरस्कारासाठी त्यांचे 'ऑक्युपेशनल मोबीलिटी अमंग शेड्युल्ड कास्ट'' पुस्तक पात्र ठरले. परिषदेचे ३१वे राष्ट्रीय अधिवेशन रत्नागिरीच्या आर. टी. गोगटे कला व विज्ञान आणि आर.व्ही. जोगळेकर वाणिज्य महाविद्यालयात पार पडले. यावेळी प्राचार्य डॉ. पी. पी. कुलकर्णी, परिषदेचे अध्यक्ष डॉ. नारायण कांबळे उपस्थित होते.

### डॉ. कराडे यांचे शैक्षणिक काम

डॉ. कराडे यांचे राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर बारा संशोधनात्मक ग्रंथ प्रकाशित झाले आहेत. यातील दोन ग्रंथ केंब्रीज स्कॉलर पब्लिकेशन, लंडन येथून प्रकाशित झाले आहेत. महाराष्ट्रात कार्यरत असलेल्या मराठी समाजशास्त्र परिषदेचे अध्यक्षस्थान त्यांनी भूषविले आहे. भारत, व्हिएन्ना (ऑस्ट्रिया), टोरोंटो (कॅनडा) व तैपेई (तैवान) येथे झालेल्या आंतराराष्ट्रीय परिषदांमध्ये त्यांनी शोधनिबंध सादर केले आहेत. शिवाजी विद्यापीठात २०१९ साली आंतरराष्ट्रीय समाजशास्त्र परिषदेचे डॉ. कराडे यांनी यशस्वी आयोजन केले. परिषदेत जगभरातून सुमारे २५० समाजशास्त्रज्ञ सहभागी झाले होते.

14 APR 2022

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# काव्यसंग्रह म्हणजे शब्दांनी घडवलेला दागिना

## डॉ. अलोक जत्राटकर यांचे प्रतिपादन : कोतोलीत अंकुर काव्यसंग्रहाचे प्रकाशन

वार्ताहर
कोलोली

काव्यसंग्रह म्हणजे शब्दानी घडवलेला मौलीक दागिना आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी, लेखक डॉ. अमोल जत्राटकर यांनी केले.

पन्हाळा तालुक्यातील माळवाडी–कोतोली येथील श्रीपतराव चौगुले आर्टस् ॲण्ड सायन्स कॉलेज येथे संशोधन समिती व मराठी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित अनिल महाजन लिखीत अंकुर काव्यसंग्रहाच्या प्रकाशन प्रसंगी ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी ज्ञानगंगा शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष, माजी बांधकाम समिती सभापती डॉ. के. एस. चौगुले होते.



श्रीपतराव चौगुले कॉलेजमध्ये 'अंकुर' काव्यसंग्रह प्रकाशन प्रसंगी बोलताना डॉ. आलोक जत्राटकर. सोबत डॉ. के. एस. चौगुले, शिवाजीराव पाटील, डॉ. जे. के. पवार, डॉ. श्रीमती व्ही. पी. पाटील,

यावेळी महात्मा ज्योतिबा फुले यांच्या प्रतिमेचे पूजन डॉ. जत्राटकर यांच्या हस्ते करण्यात आले. प्रकाशक मंदार पाटील व डॉ. जे. के. पवार यांनी मनोगत व्यक्त केले. प्रा. ए. आर. महाजन यांनी प्रास्ताविक केले. प्रा. जगदीश सरदेसाई यांनी स्वागत केले. प्रा. पी. डी. माने यांनी सूत्रसंचालन केले.डॉ. बी. एस. शिंदे यांनी आभार मानले. कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती म्हणून संस्था सचिव शिवाजीराव पाटील, प्राचार्य डॉ. जे. के. पवार, प्रभारी प्राचार्य डॉ. व्ही. पी. पाटील, प्रा. दिनेश पाटील, डॉ. बी. एन. रावण, डॉ. बी. एस. शिंदे, डॉ. उषा पवार आदी उपस्थित होते.

14 APR 2022

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# भगवान महावीरांची अष्ट आचारसूत्री

**जैन धर्मियांचे २४ वे तीर्थकर भगवान महावीर यांची गुरूवारी जयंती त्यानिमित्त...**

भगवान महावीर यांनी आपले जीवन कल्याणप्रद होण्यासाठी सांगितलेली जिनसूत्रे ही जीवनसूत्रे आहेत. महावीरांनी सांगितलेली आठ सूत्रे समजून आचरणात आणल्यास मानवता विकसित टप्प्यावर पोहचू शकेल. त्यातील ५ जीवनसूत्रे सकारात्मक आहेत. तर ३ जीवनसूत्रे ज्या गोष्टी टाळणे आवश्यक आहे ईर्ष्या, भाषा, एषणा, आदान व उत्सर्ग हे पाच सक्रीय तत्वे तर मनोगुप्ती, वचनगुप्ती व कार्यागुप्ती अशी आठ नियमांची चौकट दिली आहे.

भगवान महावीरांनी ईर्ष्या, तत्व जाणीव जागृततेशी जोडले असून, कोणतीही कृती स्वजाणीव जागृत ठेवून करण्याची आहे. कोणतीही कृती आत्म्यास साक्षी ठेवून केल्यानेच योग्य वाटचाल करू शकतो. जाणीवपूर्वक कृती करण्याचे सूत्र सर्व इतर सूत्रापेक्षा मोठे असून ते केवळ पूर्णत: अंमलात आणले पाहिजे. भाषा किंवा शब्दवापर, संभाषण हे दुसरे महत्वाचे आचरणसूत्र. मृदू भाषा, सत्य वक्तव्य, योग्य वेळी केलेले वक्तव्य हेच आचरणसूत्र असले पाहिजे. भाषेतून आपण इतरांशी तर मौनातून स्वत:शी संवाद साधत असतो. 'मीठा बोलो, कम बोलो, धीरे बोलो" हे वचन आचारसूत्राचाच भाग आहे.

तिसरे सूत्र ऐषणा किंवा भोगाची अपेक्षा आहे. शरीरास आवश्यक अन्न, वस्त्र व इतर बाबी आवश्यक तेवढ्या प्रमाणातच देणे हे आदर्श सूत्र आहे. गरज व हव्यास यातील फरक करण्यास



सांगितले.

आदान किंवा स्वीकृतीबाबतचे चौथे सूत्र : आवश्यक असेल तेवढेच स्वीकारण्याबाबतचे आहे. पाचवे सूत्र हे उत्सर्जनाबाबत पाळावयाची शूचिता आहे. सामाजिक शांतता व सलोखा याचा संबंध उत्सर्जन आचार सुत्रात आहे. मनोगुप्ती, वचनगुप्ती आणि काया गुप्ती हे लीन निग्रहाचे आचार धर्म आहेत. मनोगुप्ती मनावर, विचारावर नियंत्रण ठेवण्याशी संबंधित आहे. मनोनिग्रह हा सहावा आचारधर्म ठरतो. वचनगुप्ती यामध्ये वचन किंवा शब्द यांचा निग्रह नियंत्रण समाविष्ट आहे. वचनगुप्तीची आवश्यकता सध्याच्या माहिती तंत्राच्या आधारे होत असलेल्या संवादास अधिक लागू पडते.

हे सातवे आचारसूत्र प्रकर्षाने सर्वांनी स्वीकारणे गरजेचे आहे. कायागुप्त हे आठवे आचार सूत्र शरीर निग्रहपूर्वक नियंत्रणात ठेवण्याचे आहे. भगवान महावीरांनी आचाराची अष्टसूत्रे सद्यस्थितीत अत्यंत महत्वाची आहेत. प्रत्येकाने ती आचरणात आणल्यास विश्वशांती प्रस्थापित होऊ शकेल. आत्मभान जागे ठेवून भाषेचा समुचित वापर करीत मनोगुप्ती, वचनगुप्ती व कायागुप्ती साधली तर महावीरांची जीवनचर्या आपणही साध्य करू शकतो.

**– प्रा. विजय ककडे**
**भ. महावीर अध्यासन, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर**

1 4 APR 2022 **Times of India** जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# SUK honours D Y Patil with award in Kanbarkar's name

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** Padmashree awardee and former governor of Tripura and Bihar **Dr D Y Patil** was honoured by the Shivaji University-Kolhapur (SUK), with the national award in the name of R K Kanbarkar, the former vice-chancellor of SUK.

The event was held at Rajarshi Shahu auditorium of the SUK on Wednesday evening and was presided over by the varsity's vice-chancellor Dr D T Shirke.

Dr Arun Kanbarkar, from the Kanbarkar family, felicitated D Y Patil. His wife Shantadevi Patil was also felicitated.



Dr D Y Patil was awarded a shawl, a certificate, scarves, a memento and Rs 1.51 lakh in cash.

Shahu Chhatrapati Maharaj, in his address, said, "I have witnessed more than 60 years of Patil's career. Dr Patil used to come to meet Shahaji Maharaj in the mid-90's. And, since then, we have known each other. The decision to get detached from politics and focus on educational stream was a big one, but, Patil has handled it with courage and his good work has not only benefitted the nation, but the whole world"

He further said, "Even though the organisation is non-granted, we have not compromised in giving the best of education to our students. SUK awarded him D.Litt. and now the Kanbarkar Award is a fitting tribute to his work."

During the felicitation ceremony, Dr D Y Patil said, "Principal Kanbarkar sir is my guru (teacher) and receiving award named after him makes me feel very privileged. It is a very special feeling for me. Earlier, gurudakshina used to be given by the student to the teacher, but today, the student has got honored by his guru, this is the speciality of this award."